# 'एमसीव्हीसी'चे विद्यार्थी ठरणार 'सीईटी'ला पात्र

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे यांची माहिती; व्यवसाय शिक्षण विद्यापीठाचा प्रस्ताव मंजूर करणार

पुणे, ता. १ : किमान कौशल्यावरील आधारित अभ्यासक्रमाचे (एमसीव्हीसी) विद्यार्थी अभियांत्रिकी, वैद्यकीय व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या सामाईक प्रवेश परीक्षेसाठी (सीईटी) पात्र ठरण्यासाठीचे विधेयक येत्या पावसाळी अधिवेशनात सभागृहात संमत करू, अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे यांनी शुक्रवारी केली. व्यवसाय शिक्षण (व्होकेशनल) विद्यापीठाच्या प्रस्तावाचाही त्यात समावेश असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यातील व्यवसाय शिक्षणाचा आढावा घेण्यासाठी राज्य सरकारने सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंगच्या संचालिका स्वाती मुजुमदार यांच्या अध्यक्षतेखाली अकरा सदस्यांची समिती जानेवारीमध्ये स्थापन केली होती. या समितीने तयार केलेल्या शिफारशी टोपे यांना शुक्रवारी सादर करण्यात आल्या. व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाचा समावेश नववी, दहावीच्या इयत्तेपासून अभ्यासक्रमात करण्यात यावा, 'एमसीव्हीसी'च्या विद्यार्थ्यांना बारावीनंतर सर्व प्रकारच्या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळावा म्हणून अभ्यासक्रमात बदल करावा, स्वतंत्र व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाचे विद्यापीठ (व्होकेशनल युनिव्हर्सिटी) स्थापन करावे, असंघटित कुशल-अकुशल मनुष्यबळाचे मूल्यमापन करून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामावून घ्यावे, त्यांना व्यवसाय शिक्षण घेण्याची संधी विद्यापीठात मिळावी, व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाचा प्रसार, नियमन, विकास व व्यवस्थापन करण्यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कायदा संमत करण्यात यावा, या प्रक्रियेत खासगी उद्योगसमूहांना सामावून घ्यावे आदी शिफारशी समितीने राज्य सरकारला सादर केल्या आहेत.

या शिफारशी, कायदा व विद्यापीठाच्या प्रस्तावाबाबत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा झाली आहे. त्यांनीही अनुकूलता दर्शविली आहे. त्यानुसार पावसाळी अधिवेशनात या शिफारशी सभागृहात सादर करून मान्य झाल्यावर पुढील शैक्षणिक वर्षात त्यांची अंमलबजावणी होईल, असे टोपे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यासाठी शालेय शिक्षण मंत्री राजेंद्र दर्डा यांच्याशीही चर्चा करण्यात येणार आहे.

व्यवसाय शिक्षण विद्यापीठाची उभारणी राज्य सरकारच्या आर्थिक मदतीशिवाय होणार आहे, असे टोपे यांनी नमूद केले. या समितीच्या शिफारशींमुळे राज्यातील तंत्रशिक्षणाच्या स्वरूपात मोठा बदल होणार असल्याचा पुनरुच्चार त्यांनी या वेळी केला. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने अभ्यासक्रमातील बदलासाठी अनुकूलता दर्शविली आहे, असे मुजुमदार यांनी सांगितले.

### अभियांत्रिकी महाविद्यालयांसंदर्भात आराखडा

**अभियांत्रिकीच्या महाविद्यालयांची संख्या वाढली असून जागा रिक्त राहत आहेत, असे निदर्शनास आणून दिल्यावर, अभियांत्रिकी महाविद्यालयांची राज्यात किती आवश्यकता आहे, विद्यार्थी किती उपलब्ध आहेत, याचा आराखडा तयार करून तो अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेला सादर करण्यात येईल, असे राजेश टोपे यांनी सांगितले.**